साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

❋ परळी वैजनाथ ❋ सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ ❋ पाने-४ ❋ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.



## लक्ष्मण वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या ७ भागांच्या कथासंग्रहांसह आठ पुस्तकांचे प्रकाशन थाटात संपन्न

**परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- येथील ज्येष्ठ पत्रकार, शिक्षक श्री लक्ष्मण वाकडे यांच्या ७ बालकुमार कथासंग्रहांसह आठ पुस्तकांचे थाटात प्रकाशन करण्यात आले.**

**येथील शंकर पार्वतीनगर परिसरातील अभिषेक हॉटेलच्या टेरेस गार्डनवर कौटुंबिक कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा शुक्रवारी (दि.५) सायंकाळी संपन्न झाला. श्री वाकडे यांच्या 'एक होता ढम्या' या कथा पुस्तिकेचे सात भाग व 'श्री बैद्यनाथ ज्योतिर्लिंग परली' या माहिती पुस्तकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन यावेळी करण्यात आला.**

प्रकाशन सोहळ्यासाठी श्री लक्ष्मण वाकडे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई ईश्वरराव वाकडे यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक श्री प्रमोद गादेकर, रामकिशन दहिभाते, शिक्षिका सौ.आर.पी.गादेकर, संत धुराबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंतराव राठोड, कन्या सौ.स्नेहा शुभम पवळे, जावई श्री शुभम पवळे, ताई सौ.अरूणा बालाजी भोयटे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रकाशनाचा कार्यक्रम थाटात संपन्न झाला. प्रास्ताविक प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी केले. 'एक होता ढम्या' ही कथा पुस्तके शाळकरी मुलांना आनंद व उत्साह देणारी व संस्काराची बिजे पेरणारी आहे असे ते यावेळी म्हणाले. सौ.अरुणा भोयटे यांनी बोलतांना श्री वाकडे यांचा लेखन प्रवास मांडून प्रतिकुल परिस्थितीत लेखणाचा छंद त्यांनी जोपासला आहे, ही आम्हा कुटुंबियांसाठी अभिमानाची बाब आहे असेही त्या म्हणाल्या. प्रमोद गादेकर यांनी श्री वाकडे यांच्या कथांची पुस्तिके मुलांसाठी वाचनीय आहेत, मोठ्यांनीही वाचावीत अशी छोट्यांची ही पुस्तके मुलांवर संस्कार घडविणारी आहेत, शाळकरी मुलांनी ही पुस्तके आवर्जून वाचावीत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. वसंत राठोड यांनी पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा दिल्या. सौ.आर.पी.गादेकर यांनी बोलताना 'एक होता ढम्या' या कथा पुस्तिका सुंदर असून मुलांसाठीच्या संस्कार पुस्तिका आहेत. बालकुमारांची कथा लेखणाची लोप पावत चाललेली कला लक्ष्मण वाकडे यांनी जोपासली असल्याचे सौ.गादेकर म्हणाल्या. सौ.स्नेहा पवळे यांनी यावेळी बोलताना आमच्या पप्पांचा लिहिण्याचा छंद आदर्श घेण्याजोगा आहे. आपली साहित्यकृती निर्माण करण्यासाठी ते खूप परिश्रम घेतात. त्यांची पुस्तके वाचकप्रिय आहेत, त्यांचा हा वसा आम्ही जोपासण्याचा प्रयत्न करू असेही त्या म्हणाल्या. श्री लक्ष्मण वाकडे यांनी 'एक होता ढम्या' व आपला लेखन प्रवास यावेळी मांडला. या पुस्तकासाठी सहकार्य करणारे प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, विठ्ठलराव साबळे, दत्ता शिवगण, प्रा.डॉ.श्रीहरी गुट्टे, दत्ता दहिभाते, यांचा यावेळी शाल, पुष्पगुच्छ, ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात सातवा व जिल्ह्यातून पाचवा क्रमांक मिळविण्याबद्दल अर्णव गादेकर, कीर्तनाच्या क्षेत्रात आपले नाव करणाऱ्या जनाई कोकाटे या विद्यार्थीनीचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन आशिष भोयटे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैभव चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला सुधांशु प्रकाशन संस्थेच्या सौ.सुमन वाकडे, रामेश्वर महाराज कोकाटे, विठ्ठलराव साबळे, श्री सूर्यवंशी, श्री काळदाते, आकाश चव्हाण, रामेश्वर मुळे, श्री डोंगरे, प्रशांत नाईकवाडे, सौ.काळे, सौ.डोंगरे, सौ.चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. ❋❋

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त देण्यात येणारे पुरस्कार जाहीर

### १५ शिक्षकांचा १७ सप्टेंबरला किरणकुमार गित्ते यांच्या हस्ते होणार गौरव



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे देण्यात येणारे आदर्श शिक्षक, सेवागौरव व साहित्य गौरव पुरस्कार जाहीर झाले असून यंदा या पुरस्कारासाठी १५ जणांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांनी दिली.

गेल्या चौदा वर्षापासून साहित्य परिषदेच्या वतीने परळी तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक, साहित्य आदी क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या, योगदान देणाऱ्या शिक्षकांचा व इतर मान्यवरांचा साहित्य परिषदेच्या वतीने गौरव केला जातो.

यावर्षी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ११ शिक्षकांची निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेले शिक्षक व त्यांच्या शाळा पुढीलप्रमाणे- श्याम साधू मुंडे (मुख्याध्यापक, वसंतराव नाईक विद्यालय, वरवटी ता.अंबाजोगाई), अनुपकुमार अरुण कुसूमकर (महाराष्ट्र विद्यालय, मोहा), अजय रमाकांतराव जोशी (वैद्यनाथ विद्यालय परळी), मोहन अमृतराव कांदे (मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय आचार्य टाकळी), मुरलीधर वैजनाथ कराड (मुख्याध्यापक, बालाघाट विद्यालय, दौनापूर), प्रमोद भागवतराव गादेकर (जि.प.प्रा.शा.धामोनी ता.सोनपेठ), दिगंबर बापुराव परसेवाड (जि.प.प्रा.शाळा, मांडवा), सौ.रुपाली काशिनाथराव ढाळे (जि.प.प्रा.शाळा चांदापूर), सौ.रंजना नाथराव जाधव (जि.प.प्रा.शाळा,धावडी ता.अंबाजोगाई), सौ.मंजुषा माणिकराव शिंदे (जि.प.प्रा.शा.इंजेगाव), सौ.सुषमा सुरेशराव साळेगावकर (जि.प.प्रा.शाळा, सिरसाळा) यांची निवड करण्यात आली आहे. यंदाच्या स्व.सुवालालजी वाकेकर सेवागौरव पुरस्कारासाठी येथील सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री बाबुराव रुपनर व श्री प्रदीप तुळशीराम मुंडे (मुख्याध्यापक, रत्नेश्वर विद्यालय, टोकवाडी) यांची निवड करण्यात आली आहे.

यंदाच्या साहित्य गौरव पुरस्कारासाठी अंबाजोगाई येथील ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब यांची निवड करण्यात आली आहे. तर विशेष कार्यगौरव पुरस्कार प्रा.गणेश शेषराव चव्हाण (वैद्यनाथ महाविद्यालय) यांना देण्यात येणार आहे.

शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या सभागृहात त्रिपुरा राज्याचे नगर, बांधकाम, आरोग्य व पर्यटन विभागाचे सचिव व आपल्या परळीचे भूमिपुत्र किरणकुमार गित्ते यांच्यासह इतर निमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर, सचिव प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, पुरस्कार निवड समितीचे प्रमुख बंडू अघाव यांच्यासह कार्याध्यक्ष अनंत मुंडे, उपाध्यक्ष अरुण पवार, कोषाध्यक्ष प्रा.संजय अघाव, सहसचिव दिवाकर जोशी, प्रा.अर्चना चव्हाण, संपर्क प्रमुख बालाजी कांबळे, प्रसिद्धी प्रमुख सिध्देश्वर इंगोले व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली. ❋❋

# 'त्या' पीडितेच्या कुटुंबाला परळीकरांनी जमा करून दिली ८५ हजार रुपयांची मदत

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी रेल्वे स्थानकात दिनांक ३१ रोजी माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली होती. पंढरपूरच्या कुटुंबातील एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली. याप्रकरणी परळीकरांनी आज(दि.३) एकजुटीने वज्रमूठ दाखवत कडकडीत बंद पाळला.तसेच लाखोच्या संख्येने मूक मोर्चात सहभागी होऊन याबाबतचा निषेध नोंदवला.एवढेच नाही तर पिडित कुटुंबाला ८५ हजारांचा निधीही सुपूर्द केला आहे.

पंढरपूर येथील एका मजूर कुटुंबावर परळीच्या रेल्वेस्थानकावर अतिशय दुर्दैवी अशा प्रकारची वेळ आली. माणुसकीला काळीमा फासणारी घटना आपल्या परळीत घडली याची सल प्रत्येक संवेदनशील, सजग आणि सातत्याने अन्यायाविरुद्ध लढण्याचा बाणा असलेल्या तमाम परळीकरांच्या मनाला खटकली. चिमुकली




वरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेतील हैवानाला फाशीची शिक्षा द्यावी, हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे या मागणीसाठी उस्फूर्तपणाने बंद पाळून ना जात ना धर्म ना पंथ असा कुठलाही भेदभाव न ठेवता एकजुटीने अख्खी परळी या लेकीच्या न्यायासाठी आणि हैवानी वृत्तीला वेळीच ठेचण्यासाठी रस्त्यावर उतरल्याचे परळीकरांच्या संवेदनशीलतेचे व सकारात्मकतेचे चित्र आज परळीत बघायला मिळाले. अठरापगड जाती,धर्मातील परळीकर केवळ निषेध नोंदवण्यासाठीच रस्त्यावर उतरले नाहीत तर पीडीतेचे पुनर्वसन व्हावे यासाठी गरजवंत असलेल्या या कुटुंबाला मोठा आधार देण्याचे कामही परळीकरांच्या माध्यमातून करण्यात आले. या पिडीतेच्या कुटुंबाला भरभक्कम आर्थिक आधार मिळावा यासाठी पै-पै जमा करण्यात आली. यात तब्बल ८५ हजार रुपये आज घडीला या कुटुंबाला सुपूर्द करण्यात आले.

रेल्वे स्थानकात घडलेल्या चिमुकली वरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणी परळीत सर्व स्तरातून सुरुवातीपासूनच संताप व्यक्त केला जात होता. प्रभु वैद्यनाथाच्या पवित्र भूमीत अशा प्रकारचे कृत्य करणारी हैवानी वृत्ती निपजत असेल तर याला वेळीच ठेचले पाहिजे यासाठी आणि अशा नीच वृत्तीच्या विरोधात संवेदनशील व सकारात्मक वृत्ती असलेल्या परळीकरांनी एकत्रित येत उत्स्फूर्तपणाने आज दिवसभर कडकडीत बंद पाळला. राणी लक्ष्मीबाई टॉवर पासून निषेध मूक मोर्चाला सुरुवात झाली. हा निषेध मूक मोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून रेल्वे स्थानकापर्यंत गेला. या मूक मोर्चात परळी शहरातील सर्व स्तरातील, सर्व जाती- धर्मातील, विविध सामाजिक संघटना, संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. विशेष म्हणजे या मूक मोर्चामध्ये महिलांनी उस्फुर्त सहभाग घेत या हैवानाला फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी केली. तसेच हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे त्याचप्रमाणे रेल्वे स्थानकाच्या सुरक्षा व्यवस्थेकडे ही लक्ष वेधत सुरक्षेच्या दृष्टीने हलगर्जी करण्यात आलेल्या आरपीएफ व रेल्वे पोलीस यातील दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आपल्या मागण्यांचे निवेदन निदर्शने करून देण्यात आले. दरम्यान आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, फास्टट्रॅक वर प्रकरण चालले पाहिजे, आरपीएफच्या दोषी अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे, रेल्वेच्या सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याने घेतला पाहिजे या मागण्यांसाठी केवळ बंद पाळून व निदर्शने करून निषेध न करता प्रत्यक्ष पिडितेला आधार देण्यासाठी तमाम परळीकर संवेदनशील असल्याचेही उदाहरण बघायला मिळाले. या मूकमोर्चाच्या अनुषंगाने मूक मोर्चात चालत चालत आर्थिक मदत निधी उभा करण्यात आला. यामध्ये तब्बल ८५ हजार रुपये जमा झाले. ८५ हजार रुपयांचा हा आर्थिक निधी पीडित कुटुंबाच्या हातात सुपूर्द करण्यात आला. **

**परळी शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते डॉ.गुरूप्रसाद देशपांडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पिडित चिमुकलीच्या कुटुंबासाठी मदत म्हणून एकवीस हजार रूपये देऊन आदर्श उभा केला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे परळीत सर्वत्र कौतुक होत आहे.**






# माजीमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी घेतले श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन





परळी वैजनाथ, (बातमीदार):- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजीमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन आरतीपूजा केली. यावेळी त्यांच्यासमवेत ज्येष्ठ नेते राजेसाहेब देशमुख, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष अॅड.जीवनराव देशमुख, उत्तम माने, हनुमंत फड, रमेश ढाकणे, शंकर शेजुळ, राजाभाऊ दराडे, शिवाजीराव देशमुख, मंगलताई सोळंके, रेखा जाणराव, संदीप काळे, अशोक कदम, शिवाजी लोमटे, अंकुश दराडे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी श्री पाटील यांचा सत्कार करण्यात आला. ***

**खरय.. पण...**

**दुष्काळ पडल्याशिवाय पावसाचं, गरिबी आल्याशिवाय पैशाचं आणि माणूस गमावल्याशिवाय माणसाचं महत्व कळत नाही.!**

# आदर्श शिक्षक सर्वपल्ली राधाकृष्णन हे विसाव्या शतकातील महान तत्त्ववेत्ते

आदर्श शिक्षक सर्वपल्ली राधाकृष्णन हे विसाव्या शतकातील तुलनात्मक धर्म आणि तत्त्वज्ञानाचे सर्वात प्रतिष्ठित विद्वानांपैकी एक होते. सन १९२१ ते १९३२ या काळात कलकत्ता विद्यापीठातील किंग जॉर्ज पंचम मानसिक आणि नैतिक विज्ञान या विभागाचे अध्यक्ष होते. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठातील पूर्व धर्माचे स्पॅल्डिंग चेअर आणि नैतिकता विभागाचे सन १९३६ ते १९५२ पर्यंत ते अध्यक्ष होते. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदांतावर आधारित होते. त्यांनी या परंपरेची समकालीन आकलनासाठी पुनर्व्याख्या केली. ज्याला ते ''अज्ञात पाश्चात्य टीका'' म्हणायचे, त्यांच्यापासून त्यांनी हिंदू धर्माचा बचाव केला. समकालीन हिंदू ओळख निर्माण करण्यात राधाकृष्णन यांनी योगदान दिले. भारत आणि पश्चिम जग अशा दोन्ही देशांमध्ये हिंदू धर्माची समज निर्माण करण्यात त्यांचा मोठा प्रभाव होता. भारत



आणि पश्चिम जग यांच्यामध्ये पूल बांधणारी व्यक्ती म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला.

सर्वपल्ली राधाकृष्णन यांना त्यांच्या आयुष्यात अनेक उच्च पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सन१९३१ मध्ये नाइटहुड, १९५४ मध्ये भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला भारतरत्न आणि १९६३ मध्ये ब्रिटिश रॉयल ऑर्डर ऑफ मेरिटचे मानद सदस्यत्व त्यांना बहाल केले गेले. हेल्पेज इंडिया या भारतातील वृद्ध वंचितांसाठी एक ना - नफा संस्था असलेल्या संस्थापकांपैकी ते एक होते. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा असा विश्वास होता की ''शिक्षक हे देशातील सर्वोत्तम बुद्धिवंत असावेत.'' १९६२ पासून, त्यांचा जन्मदिवस भारतात दरवर्षी दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा शिक्षकांच्या कौतुकाचा एक विशेष दिवस आहे आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल किंवा सामान्यत: समुदायामध्ये त्यांचा सन्मान करण्यासाठी उत्सवांचा समावेश असू शकतो. शिक्षक दिन साजरा करण्याची कल्पना १९ व्या शतकात अनेक देशांमध्ये रुजली; बहुतेक प्रकरणांमध्ये, ते स्थानिक शिक्षक किंवा शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा साजरा करतात. इतर अनेक आंतरराष्ट्रीय दिवसांपेक्षा भिन्न देश हा दिवस वेगवेगळ्या तारखांना साजरा करण्याचे हे प्राथमिक कारण आहे. उदाहरणार्थ, अर्जेंटिनाने १९१५ पासून ११ सप्टेंबर रोजी डॉमिंगो फॉस्टिनो सर्मिएन्टोच्या मृत्यूचे स्मरण शिक्षक दिन म्हणून केले आहे. भारतात दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन (५ सप्टेंबर) यांचा जन्मदिवस १९६२ पासून शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. २०२२ मध्ये शिक्षक दिन ''अभार दिवस'' म्हणून साजरा करण्यात आला. सन १९९४ मध्ये युनेस्कोने स्थापन केलेल्या जागतिक शिक्षक दिनासोबत अनेक देश ५ ऑक्टोबर रोजी त्यांचा शिक्षक दिन साजरा करतात. आज शुक्रवार दि.०५ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न होत असलेल्या शिक्षक दिनानिमित्त सर्व आदर्श गुरुजन, शिक्षकांना शिक्षकदिनाच्या खुप खुप शुभेच्छा......!!!

– प्रा.धनवंत मस्के,
पाटोदा, जि.बीड.

**हसरा कोपरा..!**

**इथे मोबाईलला नीट नेटवर्क मिळत नाही रे। काय करू? सिम कार्ड बदलू की पक्ष?**

संपादकीय...

# निसर्गाचे हे वैभव जपा!

*** सुविचार ***

**जिभेचा तोल सांभाळून विवेकाने वागलं व बोललं, तर जीवन प्रेम व आनंदाने बहरतं!**

बालाघाट डोंगर रांगाच्या कुशीत वसलेले परळी वैजनाथ शहर. बीड जिल्ह्यातील शेवटच्या टोकाचे शहर. मोठी बाजारपेठ, औद्योगिकनगर, तीर्थक्षेत्र म्हणून या शहराची ओळख आहेच, राजकीय दृष्ट्याही शहर राज्य व देशाच्या नकाशावर आहे. अशी अनेक वैशिष्ट्ये मिरवणाऱ्या परळीचे नैसर्गिक वैभव मात्र अलिकडच्या काळात नष्ट होत चालले आहे.

परळी पाण्यावर ही जशी लोकोक्ती येथे आहे. तशी 'माळा आड परळी' ही लोकोक्तीही येथे आहे. हे शहर बालाघाट डोंगर रांगाच्या कुशीत वसले आहे. शहराच्या चारही दिशेने डोंगर आहेत. त्यातील काही डोंगरांना पुराणकाळापासून विशेष धार्मिक महत्व आहे. अनेक धार्मिक, पौराणिक कथा या डोंगराशी संबंधित आहेत. काही देवस्थाने डोंगरावर आहेत. परिसरात विविध डोंगराच्या रांगा आहेत. त्यामुळे परळीचे नैसर्गिक वैभव अधिकच देखणे झालेले आहे. पावसाळ्यात हे डोंगर जेव्हा हिरवा शालू पांघरतात तेंव्हा शहराचा व परिसराचा दिसणारा नजारा काही औरच असतो.

वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या यामुळे शहराचा चौफेर विकास होतो आहे. शेतजमीनीवर भूखंड पाडून भव्य घरे, इमारती थाटल्या जात आहेत. जागा कमी पडते म्हणून डोंगर फोडण्याचा सपाटा काही मंडळींनी सुरू केला आहे. पैशाच्या हव्यासा पोटी डोंगराचे खोदकाम करून त्यावर भूखंड पाडून आव्वाचे सव्वा दराने विकले जात आहेत. जेसीबी, पोकलेन सारख्या नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने या डोंगराचे लचके तोडून परळीचे वैभव नष्ट करण्याचा सपाटा भूखंड मालकांनी चालवला आहे. मुरूम, दगड व जागेसाठी अनेक डोंगर सपाट होत आहेत. काही डोंगर झालेही आहेत. यामुळे मोठी हुरहूर सर्वसामान्य परळीकरांना लागली आहे. परळीचे वैभव नष्ट होवू नये. त्याचे जतन व्हावे अशी प्रामाणिक तळमळ सर्वसामान्य परळीकरांची आहे. परंतु काहीच उपयोग होत नाही. डोंगर खोदण्याचे काम येथे दिवसरात्र युद्धपातळीवर चालू आहे. मुरूम, माती, दगड, गोट्यासाठी डोंगर खोदले जात आहेत हे दूर्दैव आहे. त्यावरील अनेक झाडे नष्ट होत आहेत. याबाबत वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग यासारख्या प्रशासकीय व संबंधित यंत्रणेने तर या वृक्षतोडीकडे पूर्णपणे डोळेझाक केली आहे. हजारो वृक्ष जमीनदोस्त होऊनही साधी कुणाविरूद्ध कारवाई केलेली नाही याचे सर्वांना आश्चर्य वाटते. पर्यावरणाबाबत सतत ओरड करणाऱ्यांनीही या वृक्षतोडीकडे दूर्लक्ष तर केलेच आहे पण वृक्षतोडीबाबत ब्र शब्दही काढला नाही. याचे आश्चर्य वाटते. ही वृक्षतोड, डोंगराचे खोदकाम, सपाटीकरण याविरूद्ध येथील जाणकार नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आदींनी संघटित होऊन रस्त्यावर येण्याची गरज आहे.

वरिष्ट शासकीय अधिकाऱ्यांनीही यात लक्ष घालणे आवश्यक वाटते. काही डोंगर खासगी मालकीचे असले तरी परळीचे हे वैभव जतन व्हावे यासाठी ते खोदले जावू नयेत म्हणून व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे. याकडे दूर्लक्ष झाल्यास व डोंगराचे असेच खोदकाम सुरू राहिल्यास एक दिवस हे नैसर्गिक वैभव नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. **

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड

सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे.
महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी. वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती. तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड



बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी., तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे. मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२० मध्ये साताऱच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.
अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई. प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत. यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता. त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा. ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.

प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझलखानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात. गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो. प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य, रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.
युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानंकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

**– संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# खोदकामामुळे परळी परिसरातील डोंगराचे अस्तित्व धोक्यात

**परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):– सतत होणाऱ्या खोदकामामुळे परळी परिसरातील डोंगराचे अस्तित्व धोक्यात आले असून यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. शहर व परिसराचे नैसर्गिक वैभवही नष्ट होत चालले आहे. या खोदकामाकडे शासकीय अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष आहे. आता याविरूद्ध पर्यावरणप्रेमी व जनतेतून उठाव होणे गरजेचे आहे.**



'माळा आड परळी' म्हणून परळीची ओळख आहे. जुन्या धार्मिक ग्रंथात हा उल्लेख सापडतो. बालाघाट डोंगररांगांच्या कुशीत हे शहर वसलेले आहे. देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी श्री वैद्यनाथ हे पाचवे ज्योतिर्लिंगाचे मंदिर परळी शहरात डोंगरावर आहे. शहर व तालुक्यात डोंगर रांगा मोठया प्रमाणात विखुरलेल्या आहेत. बहुसंख्य डोंगर शासकीय मालकीचे आहेत. काही डोंगर खासगी मालकीचेही आहेत. परळी शहर व परिसरात डोंगर रांगाची संख्या मोठी आहे. अलिकडच्या काळात जमीनीचे आव्वाचे सव्वा भाव झाल्यामुळे प्लॉटिंगसाठी खासगी मालकीचे डोंगर खोदले जात आहेत. तर शासकीय मालकीच्या डोंगरावर अतिक्रमण करण्याबरोबरच मुरूम, दगड या गौणखनिजासाठीही शहराच्या परिसरातील डोंगराचे खोदकाम सर्रास होत आहे. खासगी मालकीचे डोंगर जेसीबी सारख्या यंत्राने खोदून तेथे प्लॉटींग पाडली जात आहे. खोदकामातून मुरूम व दगड काढून घेतला जात आहे. खोदकामामुळे गेल्या काही वर्षात शहराच्या परिसरातील अनेक डोंगरांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. अनेक डोंगर मोठ्या प्रमाणात खोदले गेले आहेत व सध्याही अनेक डोंगराचे खोदकाम सुरू आहे. यामुळे परळीचे नैसर्गिक वैभव लुप्त होत चालले आहे. मुरूम व दगडाच्या विक्रीतून लाखो रूपयांची उलाढाल येथे होत आहे. खोदकामाच्या तुलनेत रॉयल्टी सरकार दरबारी जमा होत नाही. काही जणांना याचा फायदा होत असला तरी खोदकामामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता येथे वर्तविली जात आहे. या डोंगरावर असणारी झाडे खोदकामामुळे नष्ट होत आहेत. या डोंगराचे खोदकाम रोखण्यासाठी व वृक्षतोड थांबविण्यासाठी शहर व परिसरातील पर्यावरणप्रेमींनी पुढाकार घ्यावा व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालावे अशी मागणी होत आहे. दरम्यान शहर व परिसरात उजाड, बोडक्या डोंगरावर पर्यावरण प्रेमींनी वृक्षारोपण करून डोंगर हिरवे करण्याचा उपक्रम हाती घेण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, खासगी मालकीचे ज्यांचे डोंगर आहेत त्यांना शहराचे वैभव, पर्यावरण याच्याशी कोणतेही देणे-घेणे नाही. खोदकाम करून डोंगर सपाट करणे, त्यावरे प्लॉट पाडून आपली तुंबडी भरणे असा धडाका या डोंगर मालकांनी चालवला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने ही चिंतेची बाब आहे. निसर्गाचे लचके तोडण्याचे काम आणखीन किती दिवस चालणार असा सवाल येथे सर्वसामान्य नागरिक, पर्यावरण प्रेमी व्यक्त करत आहेत. ***

**दरवळणारा सुगंध...**

**'देव कुठेतरी स्वर्गात, दानव कुठेतरी पाताळात व मानव पृथ्वीवर' असा प्रकार प्रत्यक्षात नाही.माणसामध्येच देव-दानव-मानव असतात.कृष्ण हा देव होता तर त्या कृष्णाचा मामा कंस दानव होता व तोच कृष्ण ज्याच्या घरी वाढला तो नंद मानव होता. म्हणून माणसे ज्या पद्धतीने विचार करतात,बोलतात व आचार करतात त्यावर माणसे कशी होणार हे ठरत असते.**

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ : 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

**अभियानाचे उद्दिष्ट**

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुधोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
२. सक्षम पंचायत आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उठळ) व लोकवर्गणी
३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन
४. योजनांचे अभिसरण मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी
५. संस्था सक्षमीकरण शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी
६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण
७. लोकसहभाग व श्रमदान ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

**पुरस्कार रचना :**

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

**विभागस्तरीय पुरस्कार** -प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

**जिल्हास्तरीय पुरस्कार** – प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

**तालुकास्तरीय पुरस्कार :**- प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख

विशेष पुरस्कार : प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल.

अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

**– किरण वाघ,**
विभागीय संपर्क अधिकारी)